पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई

"महिला महोत्सव २०१९" च्या आयोजनाच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक-पुलदे-२०१९/प्र.क्र.३४/सां.का.२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ जुलै, २०१९.

वाचा :- १) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र.पुलदे/१११११, दि.०७.०३.२०१९, .
२) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र.पुलदे/१४२०, दि.१०.०४.२०१९, दि. २१.५.२०१९,
३) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७.४.२०१५

शासन निर्णय :-

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचेमार्फत दि. ०८.०३.२०१९ ते ११.०३.२०१९ या कालावधीत विविध कलाविष्कारांवर आधारीत "महिला महोत्सव २०१९" चे आयोजन करण्याबाबत अकादमीने प्रस्तावित केले होते. अकादमीच्या प्रस्तावानुसार "महिला महोत्सव २०१९" चे आयोजन करण्यास व सदर महोत्सवांतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमासाठी रु.१८,४५,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख पंचेचाळीस हजार फक्त) एवढया खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. कार्यक्रमासाठी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडडी -२, २२०५ कला व संस्कृती (००) (१०१) ललित कला शिक्षण (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (२२०५ १४६३) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. २६९/२०१९/व्यय-१५, दि. १७.०७.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१८१२०४०७३१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sawant Balasaheb Ishwar

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87ffeb64d4c23006f1b500524bc33913d327661599daf810e620a1eb045fa45f, serialNumber=327fe83917b9691d96f2c6aeb03b51a86a595ccac9264923ea4cd090ffd03e83, cn=Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.07.18 13:16:08 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

२. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अवर सचिव, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती, सां.का.२.